# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, बहि:शाल शिक्षण मंडळ व
# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
## वाणिज्य विभाग व प्लेसमेंट सेल
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
## "सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार विषयक प्रशिक्षण शिबीर"
दि. 5 व 6 ऑक्टोबर 2017

## शिबीर अहवाल

---

**प्रस्तावना**

भारतीय तरूण हा सुशिक्षीत असूनही बेरोजगार आहे. तर दुसरीकडे उद्योग विश्व कुशल कामगार मिळत नसल्यामूळे हवालदिल झाले आहे. या विरोधाभासाचे कारण आहे की, उद्योग विश्वाला लागणारा कूशल मनुष्यबळ पुरवठा हा नेमका कोणत्या कौशल्याचा/कुशलतेचा लागतो, ही यथोचित/योग्य माहिती या सुशिक्षीत तरूणांना नसल्यामूळे ते उद्योग विश्वाला असणारी कौशल्याची गरज पूर्ण करू शकत नाहीत. हाच धागा धरून भारताचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकास हा कार्यक्रम देश पातळीवर हाती घेतला आहे. त्याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय (वाणिज्य विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार विषयक प्रशिक्षण शिबीर' दि. ५ ते ६ ऑक्टोबर २०१७ या दरम्यान महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे आयोजित करण्यात आले होते.

**उद्घाटन समारंभ**

दिनांक ५ व ६ ऑक्टोबर २०१७ या दोन दिवसीय 'सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार विषयक प्रशिक्षण शिबीराचा' उद्घाटन समारंभ हा दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात पार पाडला.

शिबीराचे उद्घाटक म्हणून डॉ. कैलास पाथ्रीकर संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तर उद्घाटन समारंभास अध्यक्ष म्हणून पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक हे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे माजी प्रकल्प

अधिकारी डॉ. सरदारसिंग बैनाडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्घाटन समारंभात या शिबीराचे प्रास्ताविक वाणिज्य विभागचे प्रमुख डॉ. महेश थोरात यांनी केले. यात त्यांनी महाविद्यालयाची अशा विद्यार्थी केंद्रित उपक्रमाची गरज व भूमिका  समजावून सांगत विद्यार्थ्यांनी स्वत:ला रोजगारक्षम बनवणे काळाची  गरज आहे. असे प्रतिपादन केले.

यानंतर उद्घाटक म्हणून उपस्थित असलेले डॉ. कैलास पाथ्रीकर  यांनी उद्घाटनपर भाषण केले. ते म्हणाले की, सध्याचा काळ स्पर्धेचा आहे. सरकारी नोकऱ्यांच्या मागे धावता धावता उद्योग व्यवसायातील रोजगारांच्या संधीकडे दुर्लक्ष होतेच तरूणांनी त्यावर देखील लक्ष केंद्रित करावे.

उद्घाटनपर भाषणानंतर प्रमुख पाहूणे डॉ. सरदारसिंग बैनाडे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, शिक्षण हे फक्त पुस्तकात व अभ्यासक्रमात नसून दैनंदीन जीवनात येणाऱ्या समस्यांवर मात करून विजय मिळवून देणारे ज्ञान हेच खरे शिक्षण आहे, व तोच तरूण असतो जो तरून जातो. उद्योग व्यवसायात यश मिळवायचे असेल पुस्तकाच्या बाहेरचे पण ज्ञान महत्वाचे आहे.

या सत्राचे बीजभाषक म्हणून श्री राजेश चंचलानी (संचालक, सी.बी.एफ.सी. लिमिटेड, औरंगाबाद) हे होते. ते रोजगार विषयक संधी व आव्हान या विषयावर बोलताना म्हणाले की, जीवनातील विविध अनुभवच आपल्याला आपले पाय मजबुत करण्याची शक्ती देत असतात. तेच अनुभव आपल्याला दिशा दाखवितात व येथे संधी विविध क्षेत्रात आहेत त्या सर्व त्यांनी सांगितल्या तसेच म्हणाले की, जो आव्हाने स्वीकारून दीर्घकाळ टिकून राहतो तो नक्कीच यशस्वी होतो.

उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष श्री शामसुंदर नाईक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपल्या क्षेत्रात सुरूवातीपासनच अंगावर पडलेली प्रत्येक जबाबदारी यशस्वीपणे  पार पाडण्याची सवय लावल्यास वागणुकीतून यशस्वी होणे सोपे आहे. असे त्यांनी सांगून ६०—७० च्या दशकातील शिक्षणावर प्रकाश टाकला व आज त्यापेक्षा जास्त साधने उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घेण्याचा सल्ला दिला कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री लक्ष्मीकांत ढेपले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन मालेगावकर यांनी केले.

उद्घाटन समारंभानंतर उपस्थित सर्व शिबीरार्थी विद्यार्थ्यांना दुपारी १ ते २ वाजता च्या मध्यंतरामध्ये जेवण देण्यात आला.

दुपारी २ ते ४ या वेळेत दुसऱ्या सत्रास वाळूज येथील NAK उद्योग समुहाचे व्यवस्थापकीय संचालक व प्रसिध्द उद्योजक श्री दिलीप धारूरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून तर वाणिज्य विषयाचे प्रा. नितीन माळेगावकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी 'कौशल्य विकास' या विषयावर मार्गदशनपर भाषणात बोलताना श्री दिलीप धारूरकर म्हणाले की, औरंगाबाद परिक्षेत्रात मोठया प्रमाणात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उद्योग असल्यामूळे परिसरातील तरूणांना कौशल्याच्या आधारे उद्योग व्यवसायात रोजगाराच्या भरपूर संधी आहे. त्यांनी याप्रसंगी खूप सारे उदाहरणे देवून विविध कौशल्ये कशी आत्मसात करायची किंवा विकसित करायची व त्या आधारे कशा प्रकारे आपण रोजगार किंवा स्वंयरोजगार मिळवू शकतो हे देखील सांगितले. प्रसंगी त्यांनी समुहाने आल्यास आवश्यकतेनुसार मदत करण्याचे आश्वासन देखील दिले. या सत्राच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. नितीन माळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास व शिक्षण करत असतांनाच आपण आपले ध्येय निश्चित करावे व त्या दृष्टीने त्या क्षेत्राचे आपले आपले अवांतर ज्ञान संपादन करावे असे सांगून भारतीय उद्योग क्षेत्र तरूणांना जागतिक बाजारपेठेत जाण्याची संधी देते त्यासाठी online e-commerce यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

दि. ६ ऑक्टोबर २०१७ रोजी दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या व शिबीराच्या तिसऱ्या सत्रासाठी ' उद्योजकता विकासात शासनाची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पूणे येथील वाडिया कॉलेज येथील व्यवस्थापन शाखेचे प्राध्यापक डॉ. दिपक वायाळ हे उपस्थित राहिले. तर अध्यक्ष म्हणून प्रस्तुत महाविद्यलयाचे उपप्राचार्य व अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. पांडुरंग कल्याणकर हे होते.

याप्रसंगी मार्गदर्शक डॉ. दिपक वायाळ सर 'उद्योजकता विकासात शासनाची भूमिका' या विषयावर बोलताना म्हणाले की, सध्याच्या केंद्र सरकार व राज्य सरकारने विविध प्रकारच्या योजनांमधून तरूणांसाठी रोजगाराच्या विपूल संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांनी शासनाच्या Skill India, Make in India, Startup India, Standup India, मुद्रालोन या सर्वांच्या विस्तृत विवेचनानंतर त्यामध्ये असलेल्या संधी सांगून विद्यार्थ्यांना उद्योगधंदे, व्यवसाय करण्यासाठी प्रेरणा दिली.

या तिसऱ्या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, भारतीय अर्थव्यवस्था ही इतर देशांच्या तुलनेत कशी जास्तीत जास्त संधी देणारी आहे तसेच भारतीय कर रचना व नोटबंदी या सर्व बाबीवर प्रकाश टाकत त्यांनी विद्यार्थ्यांना एकाच वेळी विविध प्रकारच्या उद्योगात गूंतवणूक केल्यास अपयश येण्याची धोका कमी होतो असे सांगितले.

तिसऱ्या सत्रानंतर दुपारी १ ते २ वाजेच्या दरम्यान च्या मध्यंतरामध्ये सर्व विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आला.

दुपारी २ वाजता या दोन दिवशीय शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहूणे व प्रमुख मार्गदर्शक म्हणून अजित सिड्सचे व्यवस्थापक श्री शिवाजीराव अंभोरे  तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य एस. आर. टकले हे होते. समारोप प्रसंगी 'कृषी आधारीत व्यवसायातील रोजगार विषयक संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना श्री शिवाजीराव अंभोरे सर म्हणाले की, शेती क्षेत्रच आज आपल्याला तारू शकते. तरूणांनी शेतीकडे पाठ न फिरविता आधुनिक शेतीची कास धरावी व त्यावर आधारित इतर व्यवसायांची शेतीला जोड द्यावी म्हणजे शेतीतून आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील व शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ येणार नाही, तर याउलट शेतकरी रोजगार देणारा होईल असे प्रतिपादन त्यांनी केले.

शिबीराच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे आपल्या अध्यक्षीय समारोपात म्हणाले की, कष्टाला आयुष्यात पर्याय नाही. आजकालच्या विद्यार्थ्यांनी शॉर्टकटच्या मागे न पळता मेहनत करा. कोणतेही काम अभ्यास करून करण्याचा व हिम्मत ठेवण्याचा सल्ला  देवून यश तूमचेच आहे असे मत व्यक्त केले.

या शिबीराच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागाचे सर्व विद्यार्थी, प्रा. नितीन मालेगावकर व विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांनी परिश्रम घेतले. प्रसिध्दी प्रमुख म्हणून मराठीचे प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी भूमिका पार पाडली. अशा रितीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले सर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर यशस्वीरित्या पार पाडले.

डॉ. महेश थोरात
**कार्यक्रम समन्वयक**

डॉ. एस. आर. टकले
**प्राचार्य**






शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रतिमापूजन व दिप प्रज्वलन करतांना मान्यवर

---










मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करतांना

---




शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करतांना डॉ. महेश थोरात

---




शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी शिबीराचे उद्घाटक डॉ. कैलास पाथ्रीकर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना

---




शिबीरास उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. सरदारसिंग बैनाडे

---




''युवकांसमोरील रोजगार विषयक संधी आणि आव्हाने'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. राजेश चंचलानी

---




उद्‌घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक




प्रा नितीन माळेगावकर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना




उद्योजक श्री दिलीप धारूरकर शिबीराच्या दुसऱ्या सत्रात ''कौशल्य विकास'' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना




शिबीराच्या तिसऱ्या सत्रात '' उद्योजकता विकासात शासनाची भूमिका'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. दिपक वायाळ




शिबीराच्या समारोप सत्रामध्ये ''कृषी आधारित व्यवसायातील रोजगाराच्या संधी'' या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री शिवाजीराव अंभोरे

---




समारोप सत्रात अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले

---




शिबीरास उपस्थित विद्यार्थी




शिबीरास उपस्थित विद्यार्थी